**फौजदारी चौकशी अर्ज क्र.४१/२०२२**

रचना वि. बबन

CNR No. MHRG090001442022

**<u>नि.क्र.०५ वरील आदेश</u>**

**<u>(दिनांक १५/०७/२०२४ रोजी पारित)</u>**

अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमाच्या कलम १८ व २३ अन्वये अंतरीम आदेश व संरक्षणात्मक आदेशासाठी दाखल केला असून तिचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे.

०२. अर्जदार व सामनेवाला यांचा हिंदू शास्त्र पद्धतीने दिनांक २८.०३.२०१६ रोजी मौजे बाळसई, तालुका रोहा येथे विवाह झाला.

०३. अर्जदाराचे कथेन असे की, विवाहानंतर अर्जदार मौजे निळज, ता. माणगांव येथे नांदावयास गेली. निळज येथे सामनेवाल्याचे स्वतःचे घर आहे. सामनेवाला वेल्डींगचे काम करीत असे. सदरच्या कामातून सामनेवाल्यास दर महा रु.२५,०००/- ते ३०,०००/- मिळकत होत असे. लग्नानंतर काही महिन्यांनी सामनेवाल्याने अर्जदारास तू जेवण चांगले बनवत नाहीस, तुला साफसफाई करता येत नाही अशा कारणांवरुन शिवीगाळ व मारहाण करण्यास सुरुवात केली. सामनेवाला अर्जदाराशी शरीरसंबंध ठेवण्याचे टाळत असे, या विषयी अर्जदाराने

विचारले असता तिला शिवीगाळ व मारझोड करीत असे. सन २०1८ मध्ये अर्जदार व सामनेवाल्याने डोंबीवली येथे दवाखान्यात मुल होत नाही म्हणून ट्रीटमेंट सुरु केली. त्यानंतरही सामनेवाल्याने अर्जदारास शरीरसुखापासून वंचीत ठेवले.

०४. अर्जदार पुढे असे कथन करतात की, दि.१७/०५/२०२० रोजी सामनेवाला वेलडींगचे काम करीत असतांना घरावरुन पडल्यामुळे त्याचा उजवा हात फ्रॅक्चर झाला तेव्हा ५–६ महिने सामनेवाला घरीच राहिले व त्याची सर्व सेवा अर्जदाराने केली. दि.०१/०७/२०२० रोजी सामनेवाल्याने अर्जदारास नेसत्या वस्त्रानिशी अपमानीत करुन घराबाहेर काढले. त्यामुळे नाईलाजास्तव अर्जदारास वहिनी चैत्रा व चूलत भाउ यांसोबत खारघर येथे जावे लागले. तद्नंतर अर्जदाराने वेळोवेळी फोन करुन सासरी घेवून जाण्याची विनंती केली परंतू सामनेवाल्याने कोणताच प्रतिसाद दिला नाही. सामनेवाला वेल्डींगच्या कामातून दर महा रु.३०,०००/– कमवतो. अर्जदार हिला सध्या पुर्णपणे माहेरी वडीलांच्या आर्थीक आधारावर रहावे लागत आहे. सदरचा मुळ अर्ज निकाली लागेपर्यंत काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने दरम्यानच्या काळात तात्पुरत्या स्वरुपात सामनेवाला याने दर महा रु.१०,०००/– उदरनिर्वाहाकरीता द्यावे ही विनंती केली आहे.

०५. सामनेवाला यांनी सदरील अर्जास आपले म्हणणे देवून अर्जातील

संपूर्ण कथने नाकारलेली आहेत. सामनेवाला याने त्यांचे सदरील अर्जावर लेखी म्हणणे निशाणी १३ वर दिले आहे. सामनेवाला याच्या कथनानुसार, अर्जदार हिस मासीक पाळी येत नसल्याची बाब सामनेवाला याचेपासून लपवून ठेवून सामनेवाला याची फसवणूक करुन विश्वासघात केला. सामनेवाला याने अनेकदा अर्जदार हिचेसोबत शारीरीक संबंध प्रस्तापीत केले मात्र अर्जदार काहीना काही कारण सांगून सामनेवाल्याच्या इच्छेचा त्याग करीत असे. सदरची बाब सामनेवाल्याच्या लक्षात आल्यानंतर अर्जदार हिस घेवून वेगवेगळ्या हॉस्पीटलमध्ये ट्रीटमेंट केलेली आहे.

०६. सामनेवाला याने अर्जदाराचा कधीही छळ केलेला नाही. तसेच, आजदेखील सामनेवाला हा अर्जदाराचे पालनपोषण करण्यास तयार आहे. परंतू अर्जदार ही तिच्या मर्जीने माहेरी राहत आहे. अर्जदार हिस सामनेवाला याच्या बरोबर संसार करावयाचा नसल्यामुळे अर्जदार हिने सदरचा खोटा अर्ज दारखल केला आहे. सामनेवाला हा वेल्डींगच्या दुकानात रोजंदारीवर काम करीत असून त्याला महिन्याकाठी उत्पन्न रक्कम रु.६,०००/– असे उत्पन्न मिळते. तसेच सामनेवाल्याने अर्जदाराला केव्हाही घराबाहेर काढले नाही. याउलट अर्जदार हिची वहिनी व चुलत भाउ हे अर्जदार हिस मेव्हण्याच्या मुलाची पाचवी आहे म्हणून घेवून गेले व त्यानंतर अर्जदार परत आली नाही. सामनेवाला याने अर्जदार हिच्या वडीलांना फोन केला होता तेव्हा अर्जदार हिच्या वडीलांनी अर्जदार हिस थोडे दिवसांनी घेवून येतो असे

सांगितले.

०७. अर्जदाराच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. खालील मुद्दे विचारार्थ निघत असून मी त्यांचे कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे देत आहे.

| **क्र.** | **मूद्दे** | **निष्कर्ष** |
| --- | --- | --- |
| १. | अर्जदार ही महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५ चे कलम २३ प्रमाणे रक्कम रु.१०,०००/- एवढी अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे काय ? | अंशतः होकारार्थी. |
| २. | अर्जदार ही कलम १८ प्रमाणे संरक्षणात्मक आदेश मिळणेस पात्र आहे काय ? | नकारार्थी. |
| ३. | काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**:: कारणमिमांसा ::**

**<u>मुद्दे क्र.०१ व ०२ करीता :-</u>**

०८. अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह दि.२८.०३.२०१६ रोजी झालेला असून सामनेवाला यांनी अर्जदार व त्यांचा विवाह मान्य केलेला आहे. परंतू अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, सामनेवाला हा शारीरीक संबंध ठेवण्यास पात्र

नाही. उलटपक्षी सामनेवाला याने ते कथन नाकारुन अर्जदार ही टाळाटाळ करते व त्याबाबत तिची ट्रीटमेंट वेगवेगळ्या हॉस्पीटलमध्ये केली आहे. अर्जदार पुढे असे कथन करते की, ती तिच्या उदरनिर्वाहासाठी तिच्या वडीलांवर अवलंबून आहे. सामनेवाला हा वेल्डींगचे काम करुन महिना रक्कम रु.३०,०००/– कमवतो. त्यामुळे तिला दर महा रक्कम रु.१०,०००/– मिळावे असे कथन केले आहे.

०९. अर्जदाराच्या कथनांवरुन दि.०१/०७/२०२० रोजी सामनेवाल्याने अर्जदारास नेसत्या वस्त्रानिशी अपमानीत करुन घराबाहेर काढले. त्यामुळे नाईलाजास्तव अर्जदारास वहिनी चैत्रा व चूलत भाउ यांसोबत खारघर येथे जावे लागले. सामनेवाला यांनी अर्जदारास शारीरीक व मानसिक छळ केला आहे. याउलट सामने वाला याच्या अर्जातील कथनांवरुन अर्जदार ही तिच्या मर्जीने माहेरी राहत आहे. परंतु अर्जदार हिस सामनेवाला यांनी माहेरी निघून जाण्यास भाग पाडले अगर ती स्वतःहून माहेरी आली या सर्व बाबी दोन्ही बाजूंचा पुरावा आल्यानंतर सिध्द होणार आहेत.

१०. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, सामनेवाला हा शारीरीक संबंध ठेवण्यास पात्र नाही. उलटपक्षी सामनेवाला याने ते कथन नाकारुन अर्जदार ही टाळाटाळ करते व त्याबाबत तिची ट्रीटमेंट वेगवेगळ्या हॉस्पीटलमध्ये केली आहे.

अर्जदार पुढे असे कथन करते की, ती तिच्या उदरनिर्वाहासाठी तिच्या वडीलांवर अवलंबून आहे. सामनेवाला हा वेल्डींगचे काम करुन महिना रक्कम रु.३०,०००/– कमवतो. त्यामुळे तिला दर महा रक्कम रु.१०,०००/– मिळावे असे कथन केले आहे.

११. सामनेवाला यानी स्थावर व जंगम मालमत्तेबाबत प्रतिज्ञापत्र दाखल केलेले नाही. अर्जदाराने नि.क्र.०६ कडे व सामनेवाल्याने नि.क्र.१५ कडे स्थावर व जंगम मालमत्तेबाबत प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. अर्जदाराने सामनेवाला हा महिन्याला किती कमावतो हे दाखवणारा कागदोपत्री पुरावा अर्जासोबत दाखल केलेला नाही.

१२. अर्जदार ही माहेरी आई वडीलांकडे राहत असल्याचे अर्जातील कथनांवरुन लक्षात येते की अर्जदाराने अर्ज दाखल केल्यापासून सामनेवाला याने तिला तिच्या घरी जावून किंवा बाहेर कोणत्याही प्रकारचा त्रास दिला हे अर्जदाराने नमूद केलेले नाही. अर्जदार ही तिच्या माहेरी सुरक्षीत आहे त्यामुळे सद्यस्थितीत कोणतेही संरक्षणात्मक आदेश देण्याची गरज नाही. त्यामुळे मुद्दा क्र. २ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

१३. अर्जदार ही सामनेवाला याची कायदेशिर पत्नी आहे त्यामुळे सामनेवाला अर्जदाराची जबाबदारी कोणत्याही परिस्थीतीमध्ये नाकारू शकत नाही.

पत्नीची जबाबदारी घेणे हे सामने वाला याचे कर्तव्य आहे. सामनेवाला याच्यावर वयोवृद्ध आईची जबाबदारी आहे. अर्जदाराने तिच्या तोंडी व्यक्तव्याव्यतिरीक्त सामनेवाला हा महिना रक्कम रु.३०,०००/- कमवतो याबाबतीत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. परंतू अर्जदाराची संपूर्ण जबाबदारी ही सामनेवाल्याची आहे. त्यामुळे सामनेवालापासून अर्जदार हिस अंतरिम पोटगी मिळणे गरजेचे आहे. त्यामुळे मी मुद्या क्र.१ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवून मुद्या क्र.३ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज (नि. क्र. ५) अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला याने अर्जदार हिस दरमहा रक्कम रु.२,५००/- (अक्षरी रुपये दोन हजार पाचशे मात्र) एवढी अंतरीम पोटगी अर्ज दाखल तारखे पासून ते मुळ अर्जाचा निकाल होईपर्यंत दयावेत.

३. या आदेशाची प्रत अर्जदार व सामनेवाला यांना मोफत देण्यात यावी.

MEGHA CHANDRAKANT HASGE

Digitally signed by MEGHA CHANDRAKANT HASGE
Date: 2024.07.15 13:50:59 +0530

स्थळ : रोहा, (एम. सी. हासगे)

दि..१५.०७.२०२४ न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.